महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग,

महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक ईएसटी-२०१०/प्र.क्र.४२/ई-८ दिनांक६/४/२०११ व दिनांक ३० जुलै २०११ अन्वये पुणे विभागात प्रत्येक जिल्हयासाठी १ याप्रमाणे लघुटंकलेखकाचे एकुण ५ पदे सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडुन खालील अटींच्या अधीन राहुन स्पर्धा परीक्षेसाठी (लेखी) व तोंडी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत पुणे (Maharashtra knowledge corporation Ltd. (MKCL) Pune) यांच्या मार्फत अर्ज मागविणेत येत आहेत. सदरचे पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्याचे आहेत,

भरावयाचा पदांचा तपशिल

पुणे विभागात जिल्हा स्तरावरील प्रत्येकी १ पद याप्रमाणे एकुण भरावयाच्या पदचा तपशिल
(पुणे/सातारा/सांगली/सोलापुर/कोल्हापुर)

लघुटंकलेखक संवर्ग (वेतनश्रेणी ५२००-२०२००-ग्रेड वेतन २४००)

| अ.क्र | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकुण पदे |
|---|---|---|
| १ | अनुसुचित जाती, | १ |
| २ | अनुसुचित जमाती | - |
| ३ | विजाभज | १ |
| ४ | विमाप्र | - |
| ५ | इमाव | १ |
| ६ | खुला | २ |
| | एकुण | ५ |

लघुटंकलेखक या पदासाठी शैक्षणिक पात्रता :-

१) उमेदवाराचे वय किमान अठरा वर्ष व खुल्या प्रवर्गासाठी कमाल ३३ वर्षे व मागासवर्गीयांसाठी कमाल ३८ वर्षे असावी.
२) उमेदवाराने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.
३) उमेदवाराचा लघुलेखनाचा वेग किमान ८० शब्द प्रति मिनीट (इंग्लिश) आणि उमेदवाराचा इंग्लिश टंकलेखनाचा वेग किमान ४० शब्द प्रति मिनिट, मराठी टंकलेखनाचा वेग किमान ३० शब्द प्रतिमिनिट या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण करीत असावा.

४) महाराष्ट्र राज्य, माहिती आणि तंत्रज्ञान प्रमाणपत्र (Ms-CIT) असणे आवश्यक आहे.

उमेदवाराच्या सर्वसाधारण अटी :-

१) (i) शासन निर्णय क्र. रिपभ/प्र क्र ६६/२०११/ई- १० दिनांक २७ जुन २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

(ii) सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणातदेखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

(iii) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागु राहतील. इतर परिक्षार्थी / उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

२) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

३) प्राथमिक छाननीअंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आलेले नाहीत. अशा उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

४) लेखी परिक्षेचे स्वरुप हे लघुलेखन व टंकलेखन अशा स्वरुपाचे असेल लघुलेखनास ५० गुण व टंकलेखनास ५० गुण अशी एकुण १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

५) शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक बीसीसी २००९ / प्र.क्र २९१/०९/१६ दिनांक ५/११/२००९ नुसार मागास प्रवर्ग उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्राची सांक्षाकींत प्रत जोडावी.

६) उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

७) लेखी परीक्षा पुणे जिल्हयातील परीक्षा केंद्रावर घेणेत येईल.

८) निवड समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांचेकडे वशिला लावण्याचा अगर कोणताही दबाव आणल्यास संबधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

९) उमेदवाराने एकुण गुणांच्या किमान ४५ % गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

**सुचना :-**

१) उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने परीक्षेसाठी विहित केलेल नमुना अर्ज MKCL च्या संबधित अधिकृत प्रशिक्षण केंद्र (ALC-Authorised Learning Centre) वर विहित कालावधीत उपलब्ध होतील.या अधिकृत ALC ची माहिती http://oasis.mkcl.org/collector२०११ या संकेत स्थळावर मिळेल.

२) सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्जाची किमंत रु. २५/- (पंचवीस फक्त) राहील. ती रोखीने उपरोक्त ALC वर देवुन परिक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध / प्राप्त करुन घ्यावा.

३) सदर परिक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज संबधित अधिकृत ALC वर दिनांक १४/९/२०११ पासुन उपलब्ध राहतील. सदर अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ३०/९/२०११ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत राहील. तदनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. उमेदवारांने MKCL च्या संबधित अधिकृत प्रशिक्षण केंद्रामार्फत (ALC) भरलेले अर्जच स्वीकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी. पोस्टव्दारे , स्पीड पोस्ट, कुरिअरव्दारे आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

४) MKCL च्या संबधित अधिकृत प्रशिक्षण केंद्रावर सदरचे अर्ज हे शासकीय सुट्टी (रविवार सोडुन, कार्यालयीन वेळेत दि. ३०/९/२०११ या अंतिम मुदती पावेतो स्वीकारले जातील.

५) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर विहित ठिकाणी एक पासपोर्ट साईज फोटो लावावा व फोटोखाली दर्शविलेल्या योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी.

६) पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणा-या व लेखी परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणा-या परीक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती MKCL च्या संबधित ALC वर उपलब्ध राहील.

७) सर्वसाधारण (खुल्या प्रवर्गातील) उमेदवारांसाठी रुपये २००/- (रुपये दोनशे फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये १०० /- (रुपये शंभर फक्त) परीक्षा शुल्क असुन आवश्यक परिक्षा शुल्काचा (केवळ राष्ट्रीयकृत बँकाचा) MKCL, Payble at Pune असलेल्या धनाकर्ष (Demand Draft) अर्जासोबत जोडावा. सदर आवेदन शुल्क हे ना परतावा राहील.

८) परीपुर्ण अर्ज स्वीकारण्याची सोय MKCL च्या अधिकृत ALC केंद्रावर करण्यात आलेली आहे. अर्ज परीपुर्ण असल्यास स्वीकारला जाईल व त्याबाबतची पोहोच व उमेदवाराने भरलेल्या अर्जाचा गोषवारा तक्ता (Summary sheet) सदर अधिकृत केंद्राकडुन त्याचवेळेस दिली जाईल.

९) उमेदवारांनी ज्या (ALC) प्रशिक्षण केंद्रावरुन अर्ज प्राप्त करुन घेतले त्याच ALC केंद्रावर ते आवश्यक ते कागदपत्र व धनाकर्षासह सादर करणे आवश्यक राहील.

१०) जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार कार्यालयात नावनोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्रांची सांक्षाकित केलेली छायांकीत प्रत उपलब्ध असल्यास अर्जासोबत जोडावी.

११) अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, व जात वैधता प्रमाणपत्र, अ.ज./अ.जा. उमेदवार / अर्जदार वगळुन इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत (Non-Creamy-layer Certificate) इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. सांक्षाकीत प्रती केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्टर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यांस अर्ज अपुर्ण समजुन नाकारला जाईल.

१२) शासनाचे महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का.२ दिनांक २५/५/०१ अन्वये खुला, इ.मा.व. वि.जा (अ), भ.ज (ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) व वि.मा.प्र या प्रवर्गातील महिला उमेदवारांना माहिलांसाठी राखीव पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास त्यांनी नॉन क्रिमिलेयर दाखला सोबत जोडावा.

१३) सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसुचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र. १७/(२०१०) /१२, दि. २८/३/२००५ व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दि. १/७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुंटुबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये दि. २८/३/२००५ नुसार रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या बाबत लहान कुंटुब असल्याने सोबतच्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१४) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), इ.मा.व, व वि.मा.प्र या प्रवर्गातील उमेदवारांना सक्षम अधिका-यांचे जात व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे) अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

१५) अर्जामध्ये नमुद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळुन आल्यास संबधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास

तात्काळ सेवेतुन काढुन टाकणेस पात्र राहील. व भा.दं. वि. संहिताचे कलम १९९ व २०० (२) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

१६) सदर लेखी परिक्षेच्या गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करणेत येऊन तदनंतर पदासाठी मौखिक चाचणी घेण्यात येईल. तसेच वैद्यकीय चाचणीत अधीन राहुन पात्र उमेदवारांना नेमणुक आदेश सक्षम अधिका-याकडुन निर्गमित होतील.

१७) लघुटंकलेखक भरतीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

अ) अर्ज करणेचा कालावधी :- १४ सप्टेबंर २०११ ते ३० सप्टेबंर २०११

ब) लेखी परीक्षेचा दिनांक :- ९ ऑक्टोबंर २०११

लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवाराने ज्या ALC केंद्रावर अर्ज दाखल केला आहे. त्या ALC केंद्रावरुन दि. ३/१०/२०११ पासुन ८/१०/२०११ पर्यंत वैयक्तीरित्या प्राप्त करुन घ्यावे. (अधिक माहिती मिळण्याचे ठिकाण (MKCL) Website- संकेतस्थळ) http://oasis.mkcl.org/collector२०११ ही वेबसाईट दिनांक १४/९/२०११ पासुन कार्यरत होईल.

सही /-XXX<br>
(दिलीप बंड)<br>
विभागीय आयुक्त<br>
पुणे विभाग, पुणे

# जाहीरात

महाराष्ट्र शासन
महसुल व वा विभाग,

महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक ईएसटी-२०१०/प्र.क्र.४२/ई-८ दिनांक ६/४/२०११ व दिनांक ३० जुलै २०११ अन्वये पुणे विभागात पुणे, सातारा, सांगली, सोलापुर व कोल्हापुर या प्रत्येक जिल्हयासाठी १ याप्रमाणे लघुटंकलेखकाचे एकुण ५ पदे सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडुन परीक्षेसाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत पुणे (Maharashtra knowledge corporation Ltd. (MKCL) Pune) यांच्या मार्फत अर्ज मागविणेत येत आहेत. सदरचे पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्याचे आहेत,

भरावयाचा पदांचा तपशिल

पुणे विभागात जिल्हा स्तरावरील प्रत्येकी १ पद याप्रमाणे एकुण भरावयाच्या पदाचा तपशिल अनुशेष जाती-१, विजाभज-१, इमाव-१ व खुला-२ असे एकुण ५ पदे असुन त्याची वेतन श्रेणी (वेतनश्रेणी ५२००-२०२००-ग्रेड वेतन २४००) अशी आहे. यापदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, वय, परिक्षेची रुपरेषा, सर्वसाधारण अटी , सूचना,व इतर अनुषंगिक सविस्तर माहिती खालील वेब साईटवरती मिळेल.

1) http://oasis.mkcl.org/collector२०११
2) www.divcompune.in
3) http://pune.nic.in/
4) http://satara.nic.in/
5) http://sangli.nic.in/
6) http://solapur.nic.in/
7) http://kolhapur.nic.in/

सही /- XXX
(दिलीप बंड)
विभागीय आयुक्त पुणे,
पुणे विभाग, पुणे